## दिनदर्शिका प्रकाशन



**पंचवटी ।** पंचवटीतील नवीन आडगाव नाका येथील युवक मित्र मंडळ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा योगी माधवगिरी महाराज व महंत भक्तिचरणदास महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. या वर्षीची दिनदर्शिका अखंड भारताचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांना समर्पित केले आहे. प्रत्येक महिन्याच्या वरती मुख्य गड, किल्ले दाखविण्यात आले आहे. तपोवनातील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमात सोमवारी ( दि.१६) झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. महंत भक्तीचरण दास महाराज यांनी मंडळ तसेच सोमनाथ बोडके यांच्या कामाचे कौतुक करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात आयोजक मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके यांनी सांगितले की, गेल्या १९ वर्षापासून दिनदर्शिका बनवून परिसरात मोफत वाटप केले जाते. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके, युवा नेते संतोष जेजूरकर, विशाल पवार, महेश कापडे, शाम पिंपरकर, भूषण दराडे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाळासाहेब भवर यांनी आभार मानले.

## जॉगर्स क्लब अध्यक्षपदी भोसले

**नाशिक ।** जॉगर्स क्लबच्या अध्यक्षपदी दीपक भोसले यांची निवड झाली. त्यांचा सत्कार जॉगर्सचे माजी अध्यक्ष योगेश देशपांडे यांनी केला. भोसले यांनी यावेळी सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये जास्तीत जास्त योगदान आमच्या सर्व जॉगर्स व इतर असो. इतर संघटनेकडे सर्व सहकार्य सर्व मिळून देण्यात येईल व गोल्फ क्लब मैदानावरच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करु, असे यावेळी सांगितले. भोसले यांचा सत्कार सायकल असोसिएशनचे अरुण पवार यांनीही केला. सूत्रसंचालन कृष्णा नागरे यांनी केले. यावेळी सायकल असोसिएशनचे अध्यक्ष किशोर काळे, हेमंत गोसावी, पी.डी. जाधव, भरत गुरव, साहेबराव साळुंखे, जगदीश पोद्दार सर्व महिला सभासद उपस्थित होते. विनय बिरारी यांनी आभार मानले.

## अशोका बिझनेस स्कूलला नॅक 'अ' श्रेणी

**नाशिक ।** शिक्षणाचा दर्जा वाढवून गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे, या उद्देशाने शासनाने देशातील सर्व शैक्षणिक संस्थांना नॅक मानांकन प्राप्त करणे अनिवार्य केलेले आहे. अशोका बिझनेस स्कूल ही नॅक मानांकित संस्था यंदा मानांकनाच्या दुसऱ्या आवर्तनाला सामोरी गेली. त्यासाठी नॅशनल असेसमेंट अँड-क्रेडिटेशन कौन्सिल, बंगलूरच्या समितीतर्फे कॉलेज पडताळणी होऊन अशोका बिझनेस स्कूल मानांकन प्राप्त झाले आहे. अशोका एज्युकेशन फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. अशोक कटारिया, सचिव श्रीकांत शुक्ला, प्रशासक डॉ. नरेंद्र तेलरांधे यांनी श्रेणीच्या यशासाठी प्रभारी संचालक डॉ. महेश वाघ, अंतर्गत गुणवत्ता समन्वयक डॉ. नैनेश मुथा यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

## परभणीप्रकरणी पँथरचे निवेदन



**नाशिकरोड।** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्यांना कठोर शासन करा, आंदोलनकर्त्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यूप्रकरणी एसआयटीमार्फत चौकशी करा, अशी मागणी रियल नॅशनल पँथरने केली आहे. विभागीय महसूल आयुक्तांना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयराज पगारे यांनी निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, परभणीतील घटनेने आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. अटक केलेल्या निर्दोष व्यक्तीना त्वरित सोडावे. न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला. संबंधित पोलीस अधिकाऱ्याला निलंबित करावे. सूर्यवंशींच्या कुटुंबीयांना ३० लाखांची मदत करुन, कुटुंबातील सदस्याला शासकीय नोकरीत घ्यावे. एसआयटीमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन केले जाईल. निवेदनावर डॉ. भास्कर म्हरसाळे, दिनेश निकाळे, सागर गोतीसे, गोकुळ साळवे, अविनाश गायकवाड, अ‍ॅड. राहुल तुपलोंढे आदींच्या सह्या आहेत.

## लीलाधर बेंद्रे यांची नियुक्ती

**नाशिक ।** नागपूर येथे ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान महाराष्ट्र प्रथम अधिवेशनात जिल्हा संयोजक लीलाधर बेंद्रे यांची नियुक्ती करण्यात आली. नागपूरच्या एमबीए कॉलेजच्या सभागृह प्रतिष्ठानचे अध्यक्ष केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी लीलाधर बेंद्रे यांनी सांगितले की, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या संधीचे सोने करणार असून जिल्ह्यातील सर्व छोट्या गावांतील व शहरातील ज्येष्ठ नागरिकांना प्रतिष्ठाणशी जोडून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून जनसेवेचा ऋणानुबंध जोपासणार असल्याचे बेंद्रे यांनी सांगितले. यावेळी कार्याध्यक्ष दत्ता मेघे, सचिव डॉ. राजीव मिश्रा, प्रकाश महाजन, राजीव पाटील, सुभाष वाळवे, ज्ञानेश्वर जोशी, तुकाराम बंदावणे, दादा तिडके, शांताराम चांदोरे यांनी अभिनंदन केले.

# अतिवृष्टीबाधितांना नुकसान भरपाई

## जिल्हा प्रशासनाचे १९३ कोटींचे प्रस्ताव

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल १ हजार ७१३ गावांमधील १ लाख ४ हजार ७९४ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. त्यामुळे १ लाख ८२ हजार ३७४ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. बाधितांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १९३ कोटी ७ लाख ८३ हजार रुपयांचा प्रस्ताव तयार केला आहे.

जिल्ह्यातील देवळा, सटाणा, चांदवड, इगतपुरी व सुरगाण्याला ऑक्टोबर महिन्याच्या ११ ते १९ तारखेदरम्यान,अतिवृष्टीने झाली. तर काही ठिकाणी अवघ्या काही तासांमध्ये ढगफुटीसदृश पावसाची नोंद झाली. त्यामुळे शेतीपिकांना सर्वाधिक फटका बसला आहे.

मका पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले असून, तब्बल ३७ हजार ४२१ हेक्टरवरील पिक मातीमोल झाले. तर तब्बल २९ हजार ३५५ हेक्टर क्षेत्रावरील कांदा पीक वाया गेले आहे. २१ हजार ९१२ हेक्टर भात, १९२२९ हेक्टर सोयाबीन, ४ हजार १८३ हेक्टर द्राक्ष, ३४५ हेक्टर डाळिंब, ३५२ हेक्टर इतर भाजीपाला तसेच अन्य पिकांचीही हानी झाली आहे.

### अशी केली मागणी

शासनाच्या मार्गदर्शनानुसार ३३ टक्केवरील नुकसानीसाठी हेक्टरी आर्थिक मदत अंतिम केली आहे. त्यानुसार कोरडवाहूकरिता २७ हजार रुपये प्रतिहेक्टर आर्थिक मदत दिली जाते. याशिवाय फळपिकांसाठी १३ हजार ६०० तर बहुवार्षिक फळपिकाकरिता ३६ हजार रुपये हेक्टरी मदत शासन करते.

### नुकसानीचे आकडे

| प्रकार | बाधित गावे | शेतकरी संख्या | क्षेत्र हेक्टर | अपेक्षित निधी (लाखांत) |
|---|---|---|---|---|
| कोरडवाहू | १००१ | १२६४६० | ७०१३४.२६ | ९५३८.२६ |
| बागायत | ३६८ | ४८७११ | ३००८८.४१ | ८१३२.८७ |
| बहुवार्षिक फळपीक | ३३९ | ७२०३ | ४५७१.३८ | १६४५.७० |
| एकूण | १७१३ | १८२३७४ | १०४७९४.०५ | १९३०७.८३ |

जिल्ह्यात अतिवृष्टीची नोंद झाली असली तरी त्या दरम्यान विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजला. त्यामुळे आचारसंहितेत नुकसानीचे पंचनामे रखडले होते. आता निवडणूका पार पडल्या असून शासनदेखील गठीत झाले आहे. त्यामुळे महसूल प्रशासन व कृषी विभागाने पंचनाम्यांची कामे पूर्ण करताना नुकसानीचा अंतिम अहवाल तयार केला आहे. त्यानुसार कोरडवाहू क्षेत्रावरील ७० हजार १३४ हेक्टर, बागायतीचे ३० हजार ८८ तसेच बहूवार्षिक फळपिकांचे ४ हजार ५७२ हेक्टर असे एकूण १ लाख ४ हजार ७९४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसाठी १९३ कोटी ७ लाख ८३ हजार रुपयांची आवश्यकता आहे. तसा प्रस्ताव आता शासन स्तरावर सादर करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

# शिधापत्रिका वितरण प्रणाली संथ

## धान्य वितरणात खोळंबा

**नाशिक । प्रतिनिधी**

रेशन कार्ड असून, धान्यही समोर दिसत असताना ग्राहकांना रेशन मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक



महिन्यांपासून अत्यंत संथ गतीने चालणारी रेशनकार्ड वितरण प्रणाली अर्थात आरसीएमएसमध्ये गती येत नाही. सोबतच काही कार्डधारकांना धान्य सुरु करण्यासाठीचा १२ अंकी क्रमांकच मिळत नसल्याने ग्राहकांचे कार्ड अपडेट होत नाहीत. त्यामुळे काडधारकांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

नागरिकांना नवीन रेशन कार्ड मिळत नाही, विभक्तीकरण केले जाते. दुसऱ्या बाजूने ई-पॉस प्रणाली ठप्प असल्याने धान्य वितरणही बंदच आहे. त्यामुळे स्थानिक अधिकारी तर हतबल झाले आहेतच, पण ग्राहक आणि दुकानदारही त्रस्त झाले असल्याचे चित्र आहे. केंद्रीय स्तरावरुनच आरसीएमएस प्रणाली नियंत्रित केली जात असल्याने स्थानिक अधिकाऱ्यांच्या हातात काहीच नसल्याचे ते सांगतात. एनआयसीकडून त्यावर काम केले जाते. वारंवार तक्रारी केल्यानंतर काही वेळ सिस्टीम सुरु होते. पुन्हा तासाभरात ती बंद पडते. त्यामुळे ग्राहक येतात तेव्हा प्रणाली बंदच असल्याने कुठलेही धान्य वितरण होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी ग्राहक व दुकानदारांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत.

### ७८ टक्के धान्यवाटपाचे लक्ष्य

डिसेंबर महिन्यात राज्यात एकूण धान्य वितरणाच्या अवघे २२ टक्केच वाटप झाले आहे. म्हणजे ७८ टक्के धान्य आता १३ दिवसांत वाटायचे असून गोदामांतही धान्य उपलब्ध झालेले नाही. त्याचे परिणाम दुकानांतही आलेले नाही. सोबतच नोव्हेंबरचेही २५ टक्के धान्य वितरण बाकी असून ऑक्टोबरमधील १० टक्क्यांच्या आसपास धान्य वितरण होणे बाकी आहे. आता प्रत्येक महिन्यात ते धान्य वितरण करणे आवश्यक असल्याने ऑक्टोबर अन् नोव्हेंबरची मुदत संपली आहे. त्यामुळे हे धान्य वितरण करता येणे शक्य नसून, ते सरकारजमा झाले आहे. तर डिसेंबरचेही ७८ टक्के धान्य वितरीत होणे अशक्यच असल्याने प्रशासनाचीही मोठी अडचण झाली आहे.

केंद्रीय स्तरावरुन नियंत्रित केली जाणारी आरसीएमएस ही प्रणाली वारंवार एनआयसी आणि राज्याच्या सचिवांच्या ग्रुपवर तक्रार केल्यानंतर काही वेळापुरती सुरु होते. सर्व्हरची क्षमता वाढवण्याची गरज असून, शिल्लक धान्य, मनुष्यबळ पाहाता मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. वरिष्ठ पातळीवर त्याची परवानगी आम्ही घेत आहोत. नोव्हेंबर आणि डिसेंबर दोन्हींचेही वितरण वेळेत करण्याचा प्रयत्न करतोय.

- कैलास पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी

आरसीएमएस ही प्रणालीच्या गोंधळामुळे ई-पॉस मशीन बंदच राहते. ग्राहकांचे रेशनाकार्ड ऑनलाईन दिसत नसल्याने धान्य वाटप करता येत नाही. शिवाय डिसेंबरचेही बहुतांशी धान्यही दुकानदारांना मिळालेले नाही. ते त्वरित मिळावे. या महिन्याचे १२ दिवस शिल्लक असल्याने वितरणाची मुदत वाढवून द्यावी.

- निवृत्ती कापसे, जिल्हा अध्यक्ष दुकानदार संघटना

# जिल्ह्यात कुसुम विशेष मोहीम राबवा : शर्मा

**नाशिक । प्रतिनिधी**

कुष्ठरोग व्यक्तींची नियमित तपासणी सर्वेक्षण होण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यात आरोग्य सेवा नाशिक यांच्यामार्फत १६ ते २० डिसेंबरदरम्यान सुरू असलेली कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोध विशेष मोहीम प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोध विशेष मोहिमेबाबत जिल्हा समन्वय समितीची बैठक झाली. या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.चारूदत्त शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी, पोलीस उपनिरिक्षक पांडूरंग कावळे, डॉ. राहुल हडपे, डॉ. दीपक लोणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरूग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजातील कुष्ठरूग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचारासाठी आणणे आवश्यक आहे. यादृष्टीने या मोहिमेचे आयोजन जिल्ह्यात केले आहे. यात नियमित विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित, दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर (उदा. विटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजुर), निवासी आश्रम शाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार यांच्यावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे.

या सर्वेक्षणासाठी जिल्हा, तालुका व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर सुक्ष्म कृती आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी नितिन म्हस्के यांनी या बैठकीत सादरीकरणाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर केली.

# ज्ञानाची पोकळी ओळखून दिशा ठरवा : प्रा. सोनवणे



**नाशिक । प्रतिनिधी**

संशोधनास सुरुवात करण्याआधी आपल्या भवतालचे जग, त्या जगातील समस्या, त्या समस्यांवर किती जणांनी काय काय काम केले हे समजून घेतले पाहिजे. त्यांनतर त्यात असललेली ज्ञानाची पोकळी (नॉलेज गॅप) ओळखून मग आपले संशोधन व त्याची पुढची दिशा ठरवली पाहिजे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी येथे व्यक्त केले.

विद्यापीठाच्या यश इन सभागृहात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाच्या एम. ए. शिक्षणशास्त्र विषयाचे केंद्रप्रमुख व सनिमंत्रक यांच्यासाठी आयोजित दोन दिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा विद्यापीठ शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका प्रा. डॉ. संजीवनी महाले यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी 'एकविसाव्या शतकातील संशोधनाची क्षेत्रे' या विषयावर बोलताना सोनवणे म्हणाले की, सध्या जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, लिंग समानता, जल-माती-वायू याविषयीचे संशोधन वेगवेगळ्या पातळींवर सुरु आहे. त्यातही मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यावर अधिक भर दिला जात आहे. त्याची आपण माहिती ठेवली पाहिजे. ज्ञाननिर्मिती ही उच्च शैक्षणिक संस्थांचे उद्दिष्ट्य असते आणि ज्ञाननिर्मितीसाठी संशोधन हे अत्यावश्यक आहे. जी सतत चालणारी प्रकिया आहे. संशोधनासाठी संशोधकाच्या मनात प्रश्न निर्माण होणे आवश्यक आहे. समाजातील, परिसरातील आपल्याला भेडसावणाऱ्या, खटकणाऱ्या गोष्टी - समस्या यातून देखील संशोधन विषय प्राप्त होवू शकतो. आपण करत असलेले संशोधन त्या समस्या निवारणासाठी, समाजहितासाठी किती योगदान देवू शकते याचा विचार संशोधकाने करायला हवा.

या कार्यशाळेत प्रा. स्नेहल मांजरेकर, प्रा. विजयकुमार पाईकराव, प्रा. डॉ. संजीवनी महाले, प्रदीप पवार, चंद्रकांत पवार, प्रा. डॉ. संजीवनी महाले, डॉ. राजकुमार ननवरे, डॉ. सुभाष सोनुने, डॉ. दयाराम पवार, डॉ. प्रकाश बर्वे, प्रा. सज्जन थूल आदी तज्ञ व्यक्तींद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंह बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षणशास्त्र विषय व आयोजित कार्यशाळेविषयी खुले चर्चासत्र घेवून समारोप करण्यात येणार आहे.

# उमेदवारांनी वेळेत खर्च सादर करावा

## जिल्हा निवडणूक विभागाचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

निवडून आलेल्या उमेदवारांनी जर खर्च सादर केला नाही तर त्यांची निवड रद्द होऊ शकते. तर पराभूत झालेल्या उमदेवारांनी आता आपल्या खर्चाचा ताळेबंद मुदतीत सादर केला नाही तर मात्र त्यांना पुढील निवडणुका लढता येणार नाही. त्यामुळे सर्व उमदेवारांनी वेळेत खर्च सादर करावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक विभागाने केले आहे.

विधानसभा निवडणुकीत झालेला अंतिम खर्च उमेदवारांना २३ डिसेंबरपूर्वीच सादर करावयाचा आहे. त्यासाठी खर्च निरीक्षकही जिल्ह्यात दाखल होणार असून, ते प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय वेळापत्रक जाहीर करतील. त्यानुसार उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहून खर्चाचे सादरीकरण करावे लागेल.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांबरोबरच पैशासह विविध प्रकारच्या आमिषे दाखविण्यावरुनही चर्चेत आली. रेडिसन ब्लू हॉटेलमध्ये आढळून आलेल्या १.९८ कोटींच्या रकमेमुळे तर अधिकच चर्चा झाली. दरम्यान विविध उमदेवारांनी सादर केलेल्या खर्चात आयोगाच्या निरीक्षकांनी त्रुटी काढल्या. सादर केलेला खर्च आणि प्रत्यक्षात झालेला खर्च यात तफावत असल्याचेही निदर्शनास आणून देत त्यावर उमेदवारांना नोटिसा काढून जाबही विचारला. त्यानुसार उमेदवारांनी तो खर्च मान्यही केला. दुसऱ्या बाजूने काही उमेदवारांना स्पष्टीकरणही द्यावे लागले. आता अंतिम खर्च सादरीकरण आणि त्यातून आलेली तफावत त्यावर उमेदवारांकडून पुन्हा कुठली भूमिका घेतली जाते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### खर्च निरीक्षकांकडून उद्या तपासणी

निवडणुकीच्या खर्चाचा तपशील घेण्यासाठी आज खर्च निरीक्षक नाशिकला दाखल होणार असून, दि.१९ व दि.२० डिसेंबरला विधानसभानिहाय तपासणी केली जाणार आहे. दि. १९ रोजी विधानसभा क्रमांक-११३ ते ११७ पर्यंत मालेगाव, विधानसभा क्रमांक-११८ ते १२२ निफाड, विधानसभा क्रमांक-१२३ ते १२७ नाशिक या मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात येणार आहे. पाच विधानसभां मतदार संघांच्या खर्चाची पाहणी एक निरीक्षक करणार आहे. २० तारीख राखीव ठेवण्यात आलेली आहे. उमेदवारांनी वेळेत हजर राहण्याचे आवाहन निवडणूक उपजिल्हाधिकारी शशिकांत मंगळुरे यांनी केले.

# टॉवर कंपनी न्यायालयात

## मनपाचे १०० कोटी अडकले

**नाशिक । प्रतिनिधी**

महापालिकेला उत्पन्नाचे कमी स्त्रोत आहे. त्यात शहरात विविध ठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यातून शेकडो कोटी रुपयांचा महसूल महापालिका मिळत असतो. मात्र, एक कंपनी न्यायालयात गेल्यामुळे महापालिकेचे सुमारे १०० कोटी रुपये अडकल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे टॉवर प्रकरण पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शासनाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक टॉवर कंपनी एका ठिकाणासाठी १० हजार रुपये शुल्क मनपाकडे भरते. मात्र, मनपाला एका टॉवरसाठी अडीचलाख रुपये परवानगी शुल्क हवे आहे. शहरात इंडस, बीएसएनल, भारती एअरटेल, जिओ या कंपन्यांचे आठशेहून अधिक टॉवर उभे आहेत. पूर्वी शहर हद्दित टॉवर उभारताना महापालिकेच्या नगररचना विभागाची परवानगी घेणे बंधनकारक होते. नगररचना विभाग एका टॉवरला परवानगी देताना पाच वर्षासाठी अडीच लाख रुपये शुल्क आकारायचे. त्यामुळे मनपाच्या तिजोरीत मोबाईल टॉवरमुळे मोठा महसूल जमा व्हायचा. मात्र, इतर कंपन्यांनी परवानगी शुल्क अदा केले असताना एका कंपनीने अडीच लाख शुल्क जादा असून ते अदा करण्यास नकार दिला. २०२१-२२ मध्ये राज्य शासनाचे मनपाचे परवानगीचे अधिकार काढून स्वत:कडे घेतले. एका टॉवरसाठी दहा हजार शुल्क लागू केले. या निर्णयाचा अधार घेत त्या कंपनीने मागील पाच वर्षांपासून मोबाईल टॉवर परवानगीचा शंभर कोटींचा कर थकवल्याची बाब आता समोर आली आहे. मनपाने नोटिसा



बजावल्यानंतर कंपनीने मनपा विरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. शासन निर्णयाअगोदर शुल्क आकारण्याचे अधिकार मनपाला होते. त्यामुळे शासनाचा नियम लागू होण्यापूर्वीच १०० कोटींचा कर भरावाच लागेल, अशी भूमिका मनपाने न्यायालयात मांडली आहे. तर कंपनीने शासन नियमाचा आधार घेत १०हजार रुपयांप्रमाणे आकारणी करावी, अशी भूमिका घेतली आहे. या प्रकरणामुळे मात्र मनपाचे तब्बल १०० कोटी रुपये अडकले आहेत.

## पवार यांचे शनिवारी व्याख्यान

**जेलरोड ।** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिकरोड शाखतर्फे संवाद सृजनाशी संवाद मालिकेतंर्गत लेखक तथा वास्तुविशारद विजयकुमार पवार यांचे शनिवारी (दि.२१) सायंकाळी ६ ला दत्त मंदिर चौकातील ऋतुरंग सभागृहात व्याख्यान होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष उन्मेष गायधनी, कार्यवाह रवींद्र मालुंजकर यांनी दिली. पवार यांची लडाख डायरी, मी मनस्वी, अमरनाथ-बोलल्याशिवाय नाही अशी ग्रंथसंपदा असून ऑपरेशन गंगा हे नाटक त्यांनी लिहिले आहे. रसिकांनी कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यवाह रवींद्र मालुंजकर, कोषाध्यक्ष सुदाम सातभाई, प्रशांत केंदळे, मिलिंद गांधी, दिनेश पैठणकर, रामचंद्र शिंदे, रेखा पाटील, अ‍ॅड. संगीता पाटील, सुमन हिरे यांनी केले आहे.

SAPKAL KNOWLEDGE HUB
Kalyani Charitable Trust's
R. G. SAPKAL INSTITUTE OF PHARMACY
(D. Pharmacy | B. Pharmacy | ADMLT)
INSTITUTE CODE : 5427
DTE CHOICE CODE : 542782310
Approved by PCI, New Delhi, DTE Maharashtra,
Recognized by Government of Maharashtra
Affiliated to Maharashtra State Board of Technical Education, Mumbai & Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonare, Raigad.
ADMISSION NOTIFICATION: 2024-25
Application are invited from eligible & aspiring candidates for filling Probable Vacant Seats after CAP Rounds & Seats remaining vacant due to cancellation of admission (if any) to First Year B. Pharmacy for academic year 2024-2025.
The Schedule of admission will be displayed on the college Website https://www.rgsiop.sapkalknowledgehub.org / and Notice Board of institute. Eligibility criteria and other details as specified by State Common Entrance Test Cell, Government of Maharashtra.
Prof. Dr. Dipti G. Phadtare, Principal
Dr. Ravindra G. Sapkal, Chairman & Managing Director
CAMPUS: Sapkal Knowledge Hub, Kalyani Hills, Anjaneri, Trimbakeshwar Road, Nashik - 422 213 | Tel. : 02594-221003 / 05
Mob: 9049877867 / 8806580484
Email: office.rgsiop@sapkalknowledgehub.org | Website: www.sapkalknowledgehub.org
CORPORATE OFFICE: Sapkal Knowledge Hub, "Parag" 46, Ashwin Sector, Opp. Hotel Sai Palace, Mumbai-Agra Highway, Nashik - 422 009.
Tel.: 0253-2392450 / 51 | Mob: 9420695484 / 9881202880
ENGINEERING | MBA | B. PHARMACY | D. PHARMACY | ADMLT